# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.10.2024** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या,**

- जगाला युद्धातून नव्हे, तर भगवान गौतम बुद्धांच्या शिकवणुकीतूनच समाधान मिळेल – पंतप्रधानांचा विश्वास.

- रेल्वेचं आगाऊ आरक्षण आता 120  ऐवजी 60 दिवस आधीपर्यंतच करता येणार.

- विधानसभा निवडणुकीत मतदानासाठी उद्यापर्यंत मतदार यादीत नाव नोंदणी करता येणार.

आणि

- न्यूझीलंडविरुद्धच्या बंगळुरू क्रिकेट कसोटीत भारतीय संघ अवघ्या 46 धावात गारद.

**मोदी**

भगवान गौतम बुद्धांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार देशाच्या विकासाचा मार्ग अभूतपूर्व आणि सकारात्मक बदल घडवणारा असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय अभिधम्म दिवसानिमित्त काल नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आज जगाला युद्धातून नव्हे, तर भगवान गौतम बुद्धाच्या शिकवणुकीतूनच समाधान मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

“भाषा, साहित्य, कला आणि अध्यात्म हे देशाच्या आस्तित्वाला आकार देणारे खरेखुरे  सांस्कृतिक स्तंभ असून त्यातूनच राष्ट्राची स्वतंत्र ओळख निर्माण होते”, असंही ते म्हणाले. जगात विज्ञान - तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पुढे जाताना देशाची संस्कृती आणि मूल्यांचा अभिमान बाळगण्याचं आवाहन त्यांनी युवकांना केलं.  पाली भाषेला अभिजात दर्जा दिल्यामुळे भगवान बुद्धांच्या वारशाप्रती आदर व्यक्त केल्याचं त्यांनी सांगितलं.

**राज्यपाल**

‘हरित ऊर्जा’ हा भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या धोरणाचा महत्त्वाचा घटक असल्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. जागतिक व्यापार केंद्राच्या मुंबई विभागानं आयोजित केलेल्या, 'शाश्वत विकासासाठी हरित आणि नवीकरणीय ऊर्जा' या विषयावरच्या जागतिक व्यापार प्रदर्शनात बोलत होते. महाराष्ट्र राज्य, सौरऊर्जा, इलेक्ट्रिक वाहनं आणि बायोएनर्जी यासारख्या क्षेत्रांमध्ये आघाडीवर असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**रेल्वे**

भारतीय रेल्वेनं आगाऊ आरक्षणाचा कालावधी कमी केला आहे. त्यामुळे आता केवळ साठ दिवस अगोदर आगाऊ आरक्षण करता येईल. यापूर्वी 120 दिवस अगोदर आगाऊ आरक्षण करता येत होतं. हा नवा नियम येत्या 1 नोव्हेंबरपासून अंमलात येणार असल्याचं रेल्वे मंत्रालयानं कळवलं आहे. त्यामुळे 31 ऑक्टोबरपर्यंत आरक्षण केलेल्या पर्यटकांना या निर्णयाचा काहीही फटका बसणार नाही. मात्र, परदेशी पर्यटकांसाठी आगाऊ आरक्षणाची असलेली 365 दिवसांची मुदत तशीच कायम ठेवण्यात आली आहे.

**कांदा एक्सप्रेस**

दिवाळीपूर्वी बाजारातली कांद्याची मागणी पूर्ण करण्यासाठी नाशिक ते दिल्ली दरम्यानची कांदा एक्स्प्रेस रेल्वेगाडी काल रवाना झाली. ही विशेष गाडी 1600 मेट्रिक टन कांदा घेऊन येत्या 20 ऑक्टोबरला नवी दिल्ली इथं पोहोचणार असून त्यानंतर हा कांदा राजधानी दिल्लीतल्या घाऊक बाजारपेठांमध्ये वितरित केला जाईल, असं ग्राहक व्यवहार विभागाच्या सचिव निधी खरे यांनी सांगितलं.

**चोक्क लिंगम**

विधानसभा निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी संबंधित व्यक्तीचं नाव मतदार यादीत समाविष्ट असणं आवश्यक आहे. ज्या पात्र मतदारांनी आपलं नाव मतदार यादीत अजूनही समाविष्ट केलेलं नाही, त्यांना उद्यापर्यंत म्हणजे १९ ऑक्टोबरपर्यंत मतदार यादीत आपलं नाव नोंदवण्याची संधी आहे. आपलं नाव मतदार यादीत समाविष्ट झालं असल्याची खात्री प्रत्येक मतदाराने करावी. तसंच ज्यांनी अजून आपलं नाव मतदार यादीत समाविष्ट केलेलं नाही त्यांनी तातडीनं आपलं नाव मतदार यादीत नोंदवावं, असं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे.

**गुन्हेगारी पार्श्वभूमी**

विधानसभेसाठी निवडणूक लढवणारे उमेदवार आणि त्यांच्या राजकीय पक्षांना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार गुन्हेगारी पार्श्वभूमी प्रसिद्ध करावी लागणार आहे. निवडणूक आयोगानं सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार याबाबत सविस्तर निर्देश आणि प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची माहिती प्रसिद्ध करण्यासाठी विहीत नमुने दिले आहेत. उमेदवाराविरुद्ध प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर, Know Your Candidate या लिंकवर उपलब्ध असेल.

**कार्यक्रम**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम आकाशवाणीवर सुरू झाला आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या Youtube वरुन हा कार्यक्रम प्रसारित केला जात आहे.

**PM**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी देशाच्या प्रगतीसाठी तसच गरीब आणि वंचितांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. चंदीगडमध्ये काल पंतप्रधानांच्या उपस्थितीत एनडीएच्या

मुख्यमंत्र्यांची आणि उपमुख्यमंत्र्यांची बैठक झाली. त्यानंतर पंतप्रधानांनी समाज माध्यमावर संदेश प्रसारित केला. या बैठकीत सुशासन आणि लोकांचं जीवनमान सुधारण्यावर सविस्तर चर्चा झाल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे. तसंच संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यावरही चर्चा झाली. एनडीएचे 17 मुख्यमंत्री आणि 18 उपमुख्यमंत्री या बैठकीत सहभागी झाले होते. भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि गृहमंत्री अमित शहा यावेळी उपस्थित होते. या बैठकीत सहा ठराव मंजूर करण्यात आल्याची माहिती नड्डा यांनी दिली.

**जागावाटप**

महाविकास आघाडीची आतापर्यंत 216 जागांवर सहमती झाली आहे, उरलेल्या जागांवरही लवकरच सहमती होईल", असं विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. काँग्रेसच्या 84 जागांवरच्या उमेदवारांची छाननी झाली आहे. रविवारी केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीनंतर या 84 किंवा काँग्रेसच्या सर्व जागांवरचे उमेदवार जाहीर होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली. समाजवादी पक्षाला महाविकास आघाडी काही जागा देणार आहे, असंही ते म्हणाले. राज्याच्या 8 विभागात महाविकास आघाडीच्या किमान 3 सभा घेण्याची तयारी असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**उमेदवारी**

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसनं रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली आहे. वसंतराव चव्हाण यांचे ते सुपुत्र आहेत. वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळं इथं पोटनिवडणूक होत आहे.

**राजूशेट्टी**

विधानसभा निवडणुकीसाठी परिवर्तन महाशक्तीच्या बैठकीत सुमारे दीडशे मतदार संघांवर एकमत झालं आहे. अर्ज भरायला सुरुवात केल्यावर याची विस्तृत माहिती दिली जाईल, अशी माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी काल दिली. या बैठकीसाठी महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे छत्रपती संभाजीराजे, प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू, स्वतंत्र भारत पक्षाचे वामनराव चटप, महाराष्ट्र राज्य समितीचे शंकर अण्णा धोंडगे, भारतीय जवान किसान पक्षाचे नारायण अंकुशे आणि इतर अनेक समविचारी नेते एकत्रित आले होते. आमचे सरकार एका झेंड्याचे नसेल तर आमच्या डोक्यात तिरंगा असेल, असं बच्चू कडू यांनी यावेळी सांगितलं.

**गर्दी**

तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी मातेची मंचकी निद्रा संपून काल अश्विनी पौर्णिमेला देवी पुन्हा सिंहासनारूढ झाली. अश्विनी पौर्णिमेनिमित्त देवीच्या दर्शनासाठी कालपासूनच तुळजापुरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. या निमित्तानं तुळजापुरातील तसंच तुळजापूरकडे येणारे सर्व रस्ते कालपासूनच भाविकांच्या गर्दीने फुलून गेले होते.

**तपास पथक**

धाराशिव नगरपालिकेत काही वर्षांपूर्वी झालेल्या विविध गैरव्यवहाराप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या आदेशावरून विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. या तपास पथकाला विविध गुन्ह्यांचा तपास करून तपासाचा अहवाल प्रत्येक महिन्यास जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**निधन**

मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ दिग्दर्शक एन रेळेकर यांचं कोल्हापूरात राहत्या घरी निधन झालं. ते 78 वर्षांचे होते. त्यांनी अनेक मराठी चित्रपटाचं दिग्दर्शन केलं; तसंच काही चित्रपटांचं कथा आणि पटकथा लेखनही केलं.

**शालेय व्हॉलीबॉल**

धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेतील अंतिम सामन्यात मुलांच्या गटात छत्रपती संभाजीनगर संघानं तर मुलींच्या गटात मुंबई संघानं विजेतेपद पटकावलं आहे. यजमान लातूर विभागाच्या दोन्ही संघास उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि धाराशिव जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेच्या वतीने 19 वर्षे वयोगटातील मुला मुलींच्या राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं.

**क्रिकेट**

बंगळुरू इथल्या चिन्नास्वामी स्टेडियमवर सुरू असलेल्या भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवशी काल दिवसअखेर न्यूझीलंडच्या संघानं तीन गडी बाद 180 धावा केल्या. त्यापूर्वी भारताचा पहिला डाव सर्वबाद 46 धावांवर संपला. भारताची ही देशातली सर्वात कमी धावसंख्या आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेला भारतीय संघ खेळपट्टीवर टिकाव धरुच शकला नाही. विराट कोहलीसह भारताचे 5 फलंदाज शून्यावर बाद झाले. पावसामुळं कसोटीच्या पहिल्या दिवशी खेळ होऊ शकला नव्हता.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, किनारपट्टी भागात सोसाट्याचे वारे वाहतील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**